आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२० नोव्हेंबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ५८ पूर्णांक २२ शतांश टक्के मतदानाची नोंद, गडचिरोलीत सर्वाधिक, मुंबई शहर, ठाण्यात सर्वात कमी मतदान

- मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी राज्यात विविध लक्षवेधी मतदान केंद्र, मतदारांसाठी विविध सोयी सुविधा उपलब्ध

- मतदानादरम्यान काही ठिकाणी गैरप्रकारांचे आरोप, आचारसंहिता लागू झाल्यापासून आतापर्यंत ७०४ कोटींची मालमत्ता जप्त

- ५५वा इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आजपासून गोव्यात

**आणि**

- चीनला १-० ने नमवून आशियाई हॉकीचं अजिंक्यपद भारतीय महिला संघाला

**<><><><><>**

राज्य विधानसभा निवडणुकीसाठी आज काही अपवाद वगळता सुरळीत मतदान झालं. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत राज्यात ५८ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद झाली होती. सर्वाधिक ६९ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद गडचिरोली जिल्ह्यात झाली. सर्वात कमी ५० टक्क्यांहून कमी मतदानाची नोंद मुंबई शहर आणि ठाणे जिल्ह्यात झाली.

सर्वाधिक सुमारे ७५ टक्के  मतदान चिमूर विधानसभा मतदार संघात झालं. कागल, करवीर, ब्रह्मपुरी, शाहुवाडी, सिल्लोड, नेवासा या मतदारसंघात ७० टक्क्यांहून अधिक मतदान झालं. सर्वात कमी मतदानाची नोंद कल्याण पश्चिम

आणि कुलाबा मतदारसंघात झाली. इथं केवळ ४१ टक्के मतदान झालं. चांदिवली, पिंपरी, उल्हासनगर, भिवंडी, धारावी, हडपसर, जळगाव या मतदारसंघात ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झालं.

**<><><><><>**

विधानसभेसाठी सर्वसामान्य नागरिकांबरोबरच विविध क्षेत्रातील नामवंतांनी देखील आज मतदानाचा हक्क बजावला. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, ज्येष्ठ गायिका आशा भोसले, माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम, मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसळकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, रक्षा खडसे, प्रकाश आंबेडकर, हेमामालिनी, नाना पाटेकर, शाहरुख खान, रितेश आणि अभिनेत्री जिनिलिया देशमुख, राकेश रोशन, अक्षय कुमार, कार्तिक आर्यन, राजकुमार राव यांच्यासह मराठी आणि हिंदी मनोरंजन विश्वातील अनेक कलाकारांनी मतदानाचा हक्क बजावला. याशिवाय विविध ठिकाणी खासदार, आमदार, वरिष्ठ अधिकारी यांनी मतदान केलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी आज राज्यात बहुतांश ठिकाणी शांततेत मतदान झालं तरी मर्यादित ठिकाणी गैरवापर झाले. त निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणणाऱ्यांवर प्रशासन आणि पोलिसांनी कारवाई केली.

**नाशिक** जिल्ह्यातल्या नांदगाव मतदारसंघातले शिवसेनेचे उमेदवार सुहास कांदे यांनी अपक्ष उमेदवार समीर भुजबळ यांना आज सकाळी जीवे मारण्याची

धमकी दिली. कांदे यांनी मतदारांना एका बसमध्ये बसवून मतदान केंद्रावर आणल्याबद्दल भुजबळ यांनी आक्षेप घेतल्यानंतर हा वाद झाला.

**मुंबईत**ल्या दिंडोशी मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये मारामारी झाली.

**वर्धा** जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे नितेश कराळे यांना आज मारहाण झाली. भाजपा कार्यकर्त्यांनी ही मारहाण केल्याचा आरोप कराळे यांनी केला आहे.

**छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यात वैजापूर मतदारसंघात महायुतीचे उमेदवार रमेश बोरनारे यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**सोलापूर** जिल्ह्यातल्या **सांगोला** इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये किरकोळ वाद झाला.

**बीड** जिल्ह्यातल्या परळी मतदारसंघातल्या घाटनांदूर, चोथेवाडी, मुरंबी, जवळगाव या गावांमध्ये मतदान केंद्रावर मतदान यंत्रांची तोडफोड झाली, याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसने परस्परांवर आरोप केले आहेत. **बारामती**तल्या एका मतदान केंद्रावर दमदाटी करून बोगस मतदान केलं जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या आई शर्मिला पवार यांनी केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने हे आरोप फेटाळून लावले. **ठाणे** जिल्ह्यातल्या कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार केदार दिघे यांच्या विरोधात मद्य आणि पैसे वाटप केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

**मतदान प्रक्रिया** सुरू असताना अनेक ठिकाणी मतदान यंत्रात बिघाड झाला. याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

***होल्ड व्हाइस कास्ट***

**<><><><><>**

**बीड** विधानसभा मतदारसंघातले अपक्ष उमेदवार बाळासाहेब शिंदे यांचं आज दुपारी हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं.

**सातारा** जिल्ह्यात खंडाळा तालुक्यात एका मतदाराचा मतदान करताना हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला. तसंच डांगेघर मतदान केंद्रावर निवडणूक अधिकाऱ्याला हृदयविकाराचा झटका आला.

बीड जिल्ह्यात परळी मतदारसंघातल्या एका मतदान केंद्रावर कर्तव्यावर असलेल्या निवडणूक अधिकाऱ्याला हृदयविकाराचा सौम्य झटका आला. शहरातल्या एका रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. उपचारानंतर त्यांना घरी पाठवण्यात आल्याचं निवडणूक विभागाच्या वतीनं सांगण्यात आलं.

**<><><><><>**

लोकसभेप्रमाणेचं मेळघाटातल्या गट ग्रामपंचायत रंगुबेली अंतर्गत येणाऱ्या रंगुबेली, खामडा - किन्हीखेडा, धोकरा, कुंड आणि खोकमार या गावांनी विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकला.  रस्ते, वीज आणि शुद्ध पिण्याचे पाणी या समस्या प्रशासन आणि लोकप्रतिनिधी सोडवू शकले नाहीत. त्यामुळे मागण्या पूर्ण होईपर्यंत मतदान होणार नाही, असा निर्णय ग्रामस्थांनी घेतला आहे. या गावांमध्ये 0 टक्के मतदान झालं आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कन्नड तालुक्यातल्या रामनगर गावातल्या ग्रामस्थांनी पायाभूत सुविधांच्या अभावामुळे मतदानावर बहिष्कार घातल्याचं वृत्त आहे.

**<><><><><>**

**श्रोते हो, या बातमीपत्रानंतर लगेचच** राज्यभरातल्या मतदानाची वैशिष्ट्य सांगणारा मागोवा मतदानाचा हा विशेष कार्यक्रम आपण ऐकू शकता. या कार्यक्रमानंतर सव्वा ८ वाजता राष्ट्रीय बातमीपत्र प्रसारित होईल. निवडणूक निकालाचं विश्लेषण करणारा विशेष कार्यक्रम 'निवाडा जनतेचा' आपल्याला निकालाच्या दिवशी दिवसभर आकाशवाणीवर ऐकता येईल.

**<><><><><>**

काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं निवडणुकीसाठी बिटकॉईनच्या माध्यमातून पैसे वाटल्याचा आरोप भाजपानं केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांचा यात हात असल्याचा आरोप भाजपा प्रवक्ते सांबित पात्रा यांनी आज नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत केला. या बिटकॉईन घोटाळ्याची रक्कम २३५ कोटी रुपयेपर्यंत असल्याचा अंदाज आहे, असं पात्रा म्हणाले.

बिटकॉईन प्रकरणात भाजपा आपल्यावर खोटे आरोप करत असून हे भाजपाचं कारस्थान जनता उधळून लावेल, अशी प्रतिक्रिया प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी आज दिली. सुप्रिया सुळे यांनीही हे आरोप फेटाळले आहेत.

दरम्यान, या प्रकरणातला सायबर तज्ञ गौरव मेहता याच्या छत्तीसगढमधल्या घरावर ईडीनं छापा टाकला.

**<><><><><>**

बिहारच्या राजगीर इथं आज झालेल्या महिलांच्या आशियाई चषक हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघानं विजेतेपद पटकावलं. भारतीय संघाने चीनचा १ -० असा पराभव केला. सामन्याचं मध्यांतर होईपर्यंत दोन्ही संघांना एकही गोल

करता आला नव्हता. मध्यंतरानंतर भारताच्या दीपिकाने गोल करत खातं उघडलं आणि तोच भारतासाठी निर्णायक गोल ठरला.

**<><><><>**

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत राज्यात गेल्यावेळेपेक्षा कमी मतदान नोंदवलं गेलं.

मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे या जिल्ह्यात ४९ ते ५२ टक्के;

अकोला, जळगाव, पुणे, नागपूर, नांदेड या जिल्ह्यात ५३ते ५६ टक्के;

नाशिक, उस्मानाबाद, पालघर, रत्नागिरी, सोलापूर, वाशीम, अमरावती, धुळे, पालघर, रत्नागिरी या जिल्ह्यात ५७ ते ६० टक्के;

अहमदनगर, सातारा, सिंधुदुर्ग, औरंगाबाद, बीड, बुलढाणा, चंद्रपूर, हिंगोली, जालना, लातूर, नंदुरबार, परभणी, रायगड, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यात ६१ ते ६४ टक्के;

गोंदिया, कोल्हापूर जिल्ह्यात ६५ ते ६८ टक्के मतदान झालं.

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ६३ टक्क्यांपेक्षा जास्त आणि गेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात ६१ पूर्णांक १ दशांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ६१ पूर्णांक ३३ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्यभरातून ७०४ कोटी ७१ लाख रुपयांची मालमत्ता जप्त झाली. यात २८४ कोटी रुपये किमतीचे मौल्यवान धातू, १६० कोटी रुपये रोख, १११ कोटींचा इतर मुद्देमाल, ७५ कोटी रुपये किमतीचं मद्यं आणि ७३ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ आहेत.

**<><><><>**

राज्यात विविध ठिकाणी लक्षवेधक मतदान केंद्र तयार करण्यात आली होती. त्यात महिला विशेष, युवक विशेष, दिव्यांग विशेष, हरित अशा विविध प्रकारची मतदान केंद्र होती. काही मतदान केंद्रांवर आकर्षक सजावट करण्यात आली होती. सर्व मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधांसह दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

**गडचिरोलीत** १११ वर्षांच्या फुलमती बिनोद सरकार यांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान केलं. १०३ वर्षं वयाचे स्वातंत्र्यसैनिक जी. जी. पारिख यांनी **मुंबईतल्या** मलबार हिल मतदारसंघात मतदान केलं. **मुंबईत कुर्ला** इथं कर्करोगग्रस्त ज्येष्ठ महिला मतदारानंही प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान केलं.

नायगाव विधानसभा मतदारसंघातल्या उमरी इथं १०५ वर्षांच्या शशिकला टिप्रेसवार यांच्यासह त्यांच्या कुटुंबातल्या चार पिढ्यांनी मतदानाचा हक्क बजावला. उत्तर सोलापूरमधल्या तानाजी राठोड या अंध मतदारानेही मतदान केलं. मिरज इथल्या मतदान केंद्रात मंगल हिंगमिरे यांनी तब्येत ठीक नसतानाही प्राणवायूचा सिलेंडर सोबत घेऊन मतदान केलं.

श्रीलंकेत राहणाऱ्या मीनल रेणावीकर यांनी श्रीलंकेतून येऊन सकाळी मतदानाचा हक्क बजावला. सध्या लंडनमध्ये शिक्षण घेणाऱ्या सानिका निवंडेकर हिनं थेट रत्नागिरी गाठून पहिल्यांदाच मतदान केलं.

राज्यातली पहिल्या क्रमांकाची मतदार रविता पंकज तडवी हिनं **नंदुरबार** जिल्ह्यातल्या प्रथम क्रमांकाच्या मणिबेलीतल्या केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. पालघरच्या मल्याण मतदान केंद्रावरच्या देखाव्यातून पर्यावरणाचा संदेश देण्यात आला आहे. **वडाळा** मतदारसंघात बृहन्मुंबई महानगरपालिकेनं हरित मतदान

केंद्रावर मतदानासाठी आलेल्या पहिल्या पाच मतदारांचं रोप आणि फूल देऊन स्वागत झालं. गडचिरोली, हिंगोली जिल्ह्यातली महिला संचालित सखी मतदान केंद्रं, धुळे जिल्ह्यातलं आदर्श मतदान केंद्र, भंडाऱ्यातल्या बेला आणि रत्नागिरीच्या खेडशी इथली दिव्यांग मतदान केंद्रं, उत्तर नागपूरच्या पाचपावली इथं तृतीयपंथीयांसाठी उभारलेलं इंद्रधनुष्याच्या रंगांचं मतदान केंद्र आकर्षणाचं केंद्र ठरलं.

**पालघरच्या** जव्हार इथं आदिवासी संस्कृतीवर आधारित, तर अंधेरीतल्या वेसावे इथं कोळीवाड्याच्या संकल्पनेवर आधारित मतदान केंद्र उभारण्यात आलं होतं. नेरूळच्या तेरणा वैद्यकीय महाविद्यालयात नवी मुंबईच्या आगरी कोळी संस्कृतीचा देखावा तयार केला होता. **बीड** जिल्ह्यातल्या परळी इथं महिलांना मतदानाला प्रोत्साहित करण्यासाठी तात्पुरत्या पाळणाघरांची व्यवस्था करण्यात आली होती. दिव्यांग अधिकारांसाठी काम करणारे प्रसिद्ध कार्यकर्ते नीलेश सिंगित यांनी दिव्यांग मतदारांसाठी मतदान केंद्रांवरच्या सेवा सुविधांबाबत समाधान व्यक्त केलं.

**अकोला** जिल्ह्यातल्या अकोट इथल्या गणगणे विद्यालयात आदर्श मतदान केंद्रवार केळीची पानं आणि हिरवळीचा वापर करून हिरवा निसर्ग ही संकल्पना साकारली होती. तर **रायगडमध्ये** शिवरायांचे किल्ले या संकल्पनेनुसार मतदान केंद्र साकारलं होत. **मुंबईतल्या** जोगेश्वरी पूर्व मतदारसंघात 'बॉलीवूड' या संकल्पनेवर आधारित मतदान केंद्र तयार करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

झारखंडमध्ये विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यात शांततेत मतदान झालं. यावेळी संपूर्ण राज्यात कडेकोट बंदोबस्त होता. या दुसऱ्या टप्प्यात १२ जिल्ह्यांत ३८

मतदारसंघात मतदान झालं. दुसऱ्या टप्प्यात ५२८ उमेदवारांचं भवितव्य मतदानयंत्रामध्ये बंदिस्त झालं असून त्यात ५५ महिला उमेदवार आहेत. येत्या शनिवारी मतमोजणी होईल.

मुख्यमंत्री हेमंत सोरेन, विधानसभा अध्यक्ष रवींद्रनाथ महतो, भाजपचे प्रदेशाध्यक्ष बाबूलाल मरांडी, विरोधपक्ष नेते अमर कुमार बाउरी, ऑल झारखंड स्टुडंट युनियनचे अध्यक्ष सुदेश कुमार महतो आणि कल्पना सोरेन या मातब्बर उमेदवारांचं भवितव्य मतपेट्यांमध्ये बंद झालं आहे.

**<><><><><>**

५५व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आज गोव्यात सुरुवात झाली. तत्पूर्वी सकाळी इफ्फीच्या फिल्म बाजार या सत्राचं उद्घाटन माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू आणि प्रसिद्ध दिग्दर्शक शेखर कपूर यांच्या हस्ते झालं. या सोहळ्यासाठी चित्रपटसृष्टीतल्या अनेक कलाकार, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञांनी हजेरी लावली आहे.

**<><><><><>**

मुंबई बंगलोर महामार्गावर आज मोठ्या प्रमाणात मतदारांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. खेड शिवापूर पथकर नाक्याच्या अलीकडे पाच ते सात किलोमीटर वाहनांच्या रांगा लागलेल्या होत्या.

**//<><><><><>//**